# प्रेसनोट

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 262/2023 दिनांक : 06.07.2023**

## 1)जबरी चोरी :–

**शिवाजीनगर** :–दिनांक 05.07.2023 रोजी चे 13.00 ते 13.30 वा. चे दरम्यान, **अंकुर हॉस्पीटल समोरील रोडवर दत्तनगर येथील हनुमानमंदीरा जवळ नांदेड येथे,** यातील नमुद तीन आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी हे पायी जात असतांना त्यांना मोबाईलवर बोलण्याचा बहाणा करून थांबवुन त्यांना थापडबुक्यांनी व लाकडाने मारहाण करून जखमी करून खंजरचा धाक दाखवुन त्यांचे खिशातील पोको कंपणीचा मोबाईल किंमती 12,000/–रूपयाचा व नगदी 15,070/–रूपये असा एकुण 27,070/–रूपयाचा माल जबरीने चोरून नेले. वगैरे **फिर्यादी लतीफ चाऊस पठाण, वय 45 वर्षे, व्यवसाय प्लंबर रा. देगलुर नाका रहेमतनगर गोल्डन फंक्शन हॉल पाठीमागे नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे शिवाजीनगर** गुरनं 212/2023 कलम 394, 34 भादवी सह कलम 4/25 भाहका कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोनि/श्री माने, मो.क्र. 9403546846** हे करीत आहेत.

## 2)विवाहीतेचा छळ :–

**1)नांदेड ग्रामीण** :– दिनांक 12.02.2023 ते दि.24.04.2023 चे दरम्यान, **वेळोवेळी फिर्यादीचे सासरी जि. प. शाळेसमोर वसरणी ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद पाच आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तु वेगळया जातीची आहेत, तुझ्यामुळे आमच्या समाजात इज्जत राहीली नाही, तु आमच्या घरात शोभत नाहीस माझे मुलांचे लग्न जातीत झाले असे तर त्याला 4,00,000/–रूपये हुंडा मिळाला असता असे म्हणुन माझे वडीलांनी एक लाख रूपये दिले होते तर एक लाख रूपयाला काय होते अजुन जास्त पैसे घेवुन उपाशी पोटी ठेवुन शिवीगाळ व मारहाण करून शारिरीक व माणसीक छळ केला. वगैरे **फिर्यादी 24 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 492/2023 कलम 498(अ), 323, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2168 जावेद, मो.क्रं. 8999978576** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण** :– दिनांक 08.07.2022 ते दि. 31.05.2023 चे दरम्यान, **फिर्यादीचे सासरी मंत्री गल्ली महावीर चौक मानवत ता. मानवत जि. परभणी ह. मु. डी 41 सिडको नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादी बाईस तुझे नवऱ्याला सरकारी नौकरी लागणार आहे. तिथे डोनेशन व घर खरेदीसाठी माहेरहुन 25,00,000/–रू घेवुन ये म्हणुन शिवीगाळ व मारहाण करून शारीरक व माणसीक छळ केला. व तुला नेवुन कुठेतरी विकतो अशी धमकी दिली. वगैरे **फिर्यादी 21 वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 489/2023 कलम 498(अ), 323, 504, 34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1912 तिडके, मो.क्रं. 8421394862** हे करीत आहेत.

## 3)शासकीय कामात अडथळा :–

**1)माळाकोळी** :– दिनांक 05.07.2023 रोजी 10.30 वा. सुमारास, **मौ. दगडसांगवी जि. प. चे मुख्याध्यापक कक्षात ता. लोहा जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी व साक्षीदार हे शासकीय काम करीत असतांना यातील नमुद आरोपीने दारू पिऊन फिर्यादीस तुमचे शिक्षक वेळेवर येत नाहीत व मुलांना शिकवीत नाहीत म्हणुन फिर्यादी व साक्षीदारांना शिवीगाळ करून कार्यालयातील रजिस्टर फाडुन नुकसान करून शासकीय कामात अडथळा निर्माण केला. तसेच अंगणवाडी शाळेत जाऊन तेथील महिलांना शिवीगाळ करून शाळेतील पोषण आहाराची नास धुस केली. वगैरे **फिर्यादी मनमत विठ्ठलराव पाटील, व्यवसाय मुख्याध्यापक जि. प. प्रा. शाळा दगड सांगवी ता. लोहा जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे माळाकोळी** गुरनं 86/2023 कलम 353, 427, 504 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री आडे, मो.क्र. 9970125563** हे करीत आहेत.

## 4)जुगार :–

**1)वजिराबाद** :– दिनांक 05.07.2023 रोजी चे 14.10 वा. चे सुमारास, **बसस्थानक जाणारे ए–वन हॉटेलचे पाठीमागे मोकळया जागेत सार्वजनिक ठिकाणी नांदेड येथे,** यातील नमुद चार आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मधुर टाईम कल्याण नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना साहित्य व नगदी 4070/–रूपयाचे माला सह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/मनोज बापुसिंह परदेशी, वय 40 वर्षे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 260/2023 कलम 12 (अ) म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1007 झावरे, मो.क्रं. 9923922533** हे करीत आहेत.

## 5)प्रोव्हिबीशन :–

**1)कुंटूर :–** दिनांक 05.07.2023 रोजी चे 14.05 वा. चे सुमारास, **मौ. मनुर शिवार ता. नायगाव जि. नांदेड** येथे, यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 1540/–रूपयाची चोरटी विक्री करण्याच्या उदेशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोहेकॉ/श्री लक्ष्मण माधवराव सोनकांबळे, ने. पोस्टे कुंटूर** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे कुंटूर गुरनं 114/2023** कलम 65 (ई), म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1198 कंधारे, मो.नं. 9657718232** हे करीत आहेत.

## 6)विषारी औषध पिऊन आत्महत्या :–

**1)बारड :–**दिनांक 04.07.2023 रोजी चे 12.00 वा. चे सुमारास, **सरकारी दवाखाना विष्णुपूरी नांदेड येथे,** यातील **मयत नामे दत्तराम पि. मुंजाजी गिरे, वय 62 वर्षे, व्यवसाय शेती रा. सरेगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी सततचे नापीकीला व बँकेच्या, कर्जाला कंटाळुन पिकावर फवारायाचे विषारी औषध पिऊन आत्महत्या केला. वगैरे **खबर देणार एकनाथ दत्तराम गिरे, वय 28 वर्षे, व्यवसाय शेती रा. सरेगाव ता. मुदखेड जि. नांदेड** यांनी दिलेल्या खबरीवरुन **पोस्टे बारड** आ. मृ. 15/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री वानोळे, मो.नं. 8208506753** हे करीत आहेत.

## 7)विद्युत शॉक लागुन मृत्यु :–

**1)कुंटूर :–**दिनांक 27.06.2023 रोजी चे 09.30 वा. चे सुमारास, **इकळीमोर शिवार ता. नायगावं जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दत्तप्रसाद राजगीर गिरी, वय 18 वर्षे, रा. इकळीमोर ता. नायगाव जि. नांदेड,** हा त्याचे शेतात भेंडीचे बियाणे लावत असताना डी पी जवळ ओल्या जमीनीवर तार पडल्याने त्यास धक्का लागुन शॉक लागल्याने त्यास उपचार कामी सरकारी दवाखाना नायगाव येथे शरीक केले असता तो मरण पावला. वगैरे **खबर देणार राजगीर आनंदगीर गिरी, वय 54 वर्षे, व्यवसाय शेती रा. इकळीमोर ता. नायगांव जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरी वरुन **पोस्टे कुंटूर** आ. मृ. 20/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/1592 निकम, मो.नं. 9657718232** हे करीत आहेत.

**2)कंधार :–**दिनांक 05.07.2023 रोजी चे 11.00 वा. चे सुमारास, शामराव नारायण कावळे, **यांचे घराचे स्लॅपवर बहादरपुरा कंधार ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे दत्ता गंगाराम कानगुले, वय 37 वर्षे, व्यवसाय मजुरी रा. बहादरपुरा ता. कंधार जि. नांदेड,** हा त्याचे घरावर टाकण्यासाठी टिनपत्रे कमी पडल्याने ते ढोर गल्ली बहादरपुरा येथील शामराव नारायण कावळे यांचे घराचे स्लॅपवर ठेवलेले लोखंडी टिनपत्रे स्लॅप वरून खाली काढत असतांना त्या घरावरून गेलेला 11 केव्ही लाईनला टी पत्राचा स्पर्श होऊन इलेक्ट्रीक शॉक लागुन मरण पावला. वगैरे **खबर देणार सुनिता दत्ता कानगुले, वय 32 वर्षे, व्यवसाय घरकाम रा. बहादरपुरा ता. कंधार जि. नांदेड,** यांनी दिलेल्या खबरी वरुन **पोस्टे कंधार** आ. मृ. 30/2023 कलम 174 सीआरपीसी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोहेकॉ/2059 सानप, मो.नं. 9421849989** हे करीत आहेत.

जनसंपर्क अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड